महा मेट्रो

PUNE METRO

# पुणे मेट्रोचे रूळ टाकण्यास सुरवात





पुणे मेट्रो रेल प्रकल्पात २ मार्गिका आहेत . पीसीएमसी ते स्वारगेट १६.६ किमी व वनाज ते रामवाडी १४.६ किमी लांबीच्या मार्गिका आहेत. त्यापैकी पीसीएमसी ते रेंज हिल्स ह्या ११.५७ किमी मार्गावर अंत्यत वगाने उन्नत मार्ग उभारण्याचे काम सुरु आहे . या मार्गावरच पुणे मेट्रोने डिसेंबर २०१९ मध्ये चाचण्या पूर्ण करण्याचे नियोजन केले आहे . या अनुषंगाने या मार्गावर रेल्वे रूळ टाकण्याचे काम ११.०७.२०१९ रोजी सुरु झाले आहे . पीसीएमसी ते संत तुकारामनगर मेट्रो स्थानका दरम्यान या कामाची सुरवात झाली आहे. पुणे मेट्रोचे रूळ हे स्टँडर्ड गेज (१४३५ एमएम ) या प्रकारातले असून (Ballastless) बॅलास्ट विरहीत पण असणार आहे .

पुणे मेट्रो UIC ६० E १, १०८० ग्रेड, हेड हार्डन याप्रकारचे रेल्वे रूळ वापरणार आहे. जगभरातल्या अत्याधुनिक रेल्वे प्रणाली याच प्रकारचे रेल्वे रूळ वापरत आहे. महामेट्रोसाठी रेल्वे रूळ १८ मी व २५ मी या लांबीमध्ये वापरण्यात येणार आहे . हे रेल्वे रूळ अत्याधुनिक फ्लॅश बट व अल्युमिना थर्मिट वेल्डिंग तंत्रज्ञानाद्वारे एकमेकांना जोडण्यात येणार आहे . अश्या जोडलेल्या रेल्वे रुळांचे अत्याधुनिक अल्ट्रा सॉनिक मशीनद्वारे टेस्टिंग केले जाणार आहे. या रेलचा वरचा भाग (हेड) हा विशिष्ट तंत्रज्ञानाद्वारे कठीण (हार्ड) केलेला असेल त्यामुळे या रुळाची झीज कमी होईल व त्यामुळे रुळांचे आयुष्य वाढेल व रूळ बदलण्याची लवकर लवकर आवश्यकता पडणार नाही .

पुणे मेट्रो प्रकल्पासाठी एकूण ९००० M T रुळांची आवश्यकता आहे . रिच १ व रिच २ प्रायारीटी सेक्शन साठी एकूण ३००० M T रूळ लागणार आहेत . नागपूरहून ६०० M T रूळ पुण्यासाठी सध्या येणार आहेत. हे रूळ इस्ट मेटल A G या स्विझर्लंडच्या कंपनीने त्यांच्या सायबेरियातील कारखान्यात बनविले

आहेत.

पुणे मेट्रोचा उन्नत व भूमिगत मार्गाचा ट्रॅक हा बॅलास्ट लेस या प्रकारातला असणार आहे . सामान्यतः रेल्वे प्रणालीत रेल्वे रूळ दगडाच्या खडीवर ( बॅलास्ट) टाकण्यात येतात . जेणेकरून रेल्वे रुळावरून कोच जाताना रेल्वे रूळ खाली दाबले जाऊन कुशन सारखा परिणाम साधता येतो. बॅलास्ट सहित (Ballasted) रुळांचे अनेक तोटे असल्यामुळे पुणे मेट्रो मध्ये बॅलास्ट विरहीत (Ballastless) रूळ टाकण्यात येणार आहे. यामुळे प्रवाशांना आरामदायक (कम्फर्ट) मध्ये वाढ होणार आहे. अशाप्रकारचा बॅलास्ट विरहीत ट्रॅकचे इतरही अनेक फायदे आहेत .

१) कमीत कमी देखभालीची गरज

२) पर्यावरणास अनुकूल

३) प्रदूषण मुक्त

४) रायडींग कम्फर्ट चांगला

५) रेल्वे रुळांची आयुष्य वाढवण्यासाठी मदतगार

महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ . ब्रिजेश दीक्षित यांनी म्हटले आहे कि , पुणे मेट्रो प्रकल्प नियोजित वेळेनुसार सुरु करण्यासाठी संपूर्ण नियोजन झाले असून त्याचाच एक हिस्सा म्हणून रेल्वे रूळ टाकण्याचे काम सुरु करण्यात आले आहे.